महाराष्ट्र पोलीस

स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३.२३०९७१० E.Mail - pilcbnskr@gmail.com

---

# प्रेसनोट

दिनांक:- ०९/१२/२०१८

## गुजरात महामार्गावर लुटमार करणारे गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केले जेरबंद

---

दिनांक २९ नोव्हेंबर २०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास सुरगाणा तालुक्यातील भदर गावातील रहिवासी **श्री. सुभाष चिंतामण पवार** हे त्यांचे बजाज डिस्कव्हर मोटर सायकलने सुरगाणा येथे जात असतांना नाशिक ते सापुतारा महामार्गावर घोटुळ गावचे शिवारात **अज्ञात ०४ आरोपीतांनी** त्यांची दुचाकी अडवुन त्यांना चाकुचा धाक दाखवुन मारहाण करून त्यांचे कब्जातील रोख रूपये, मोबाईल फोन व बजाज डिस्कव्हर दुचाकी असा एकुण ३३,१००/- रू. किं.चा ऐवज **जबरीने लुटमार** करून नेला होता. सदर बाबत **सुरगाणा पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नंबर ५४/२०१८** भादवि कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. नीलोत्पल सो** यांनी जिल्हयातील महामार्गांवरील जबरी लुटमारीचे गुन्हयांचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकाने वरील गुन्हयातील फिर्यादी यांचेकडे घडले प्रकाराबाबत सविस्तर चौकशी केली तसेच सदर गुन्हयाचे कार्यप्रणालीवरून गुन्हेगार हे नजीकचे परिसरातीलच असल्याचा तर्क लावुन समांतर तपास सुरू केला. दरम्यान स्थागुशाचे पथक सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा सुरगाणा ते सापुतारा महामार्गावर शोध घेत असतांना खब-यामार्फत मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे काही संशयीत इसम हतगड परिसरात सदर गुन्हयात जबरीने लुटमार करून नेलेली मोटर सायकल नंबरप्लेट काढुन वापरत असल्याचे खात्रीशीररित्या समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने **हतगड शिवारात रात्रभर** सापळा रचुन संशयीत नामे **१) कल्पेश बाबुराव वाघमारे, वय १८,** रा. पळसेत, ता.सुरगाणा, **२) धर्मराज काशिनाथ गायकवाड, वय २२,** रा. शिराटा, ता.सुरगाणा यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले संशयीतांना पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी त्यांचे साथीदार नामे ३) बाबु थविल, रा. गारमाळ, ता.सुरगाणा, ४) केशव वारडे, रा. पळसेत, ता.सुरगाणा यांचेसह गेल्या १० दिवसांपुर्वी घोटुळ गावचे शिवारात एका इसमास रात्रीचे सुमारास अडवुन त्यास चाकुचा धाक दाखवुन मारहाण करून त्याचेकडील मोटर सायकल, रोख व मोबाईल जबरीने लुटमार केल्याची कबुली दिली आहे. ताब्यात घेतलेले आरोपीतांचे कब्जातुन वरील गुन्हयात जबरीने लुटमार करून नेलेली **किं.रू. १५,००० ची बजाज डिस्कव्हर मोटर सायकल हस्तगत** करण्यात आली असुन सदर आरोपीतांना गुन्हयाचे पुढील तपासकामी सुरगाणा पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील आरोपीतांचे साथीदारांचा स्थागुशाचे पथक शोध घेत असुन त्यांचेकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, पोलीस उपनिरीक्षक **श्री. स्वप्निल नाईक**, सपोउनि रामभाउ मुंढे, संजय पाटील, पोहवा हनुमंत महाले, प्रकाश तुपलोंढे, जे.के.सुर्यवंशी, संदिप शिरोळे, कैलास देखमुख, पोना वसंत खांडवी, पोकॉ प्रदिप बहिरम, हेमंत गिलबिले, चालक पोना रमेश काकडे व चौधरी यांचे पथकाने सुरगाणा तालुक्यातील आरोपीतांना ताब्यात घेवुन जबरी लुटमारीचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.